# २०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक ४

(प्रकाशन दिनांक - १० ऑक्टोबर २०१८)

## दीक्षांत समारंभ

संदर्भ - म.सा.वि.अ. २०१६ - कलम १३०

# UNIFORM STATUTE No. 4 OF 2018

(Publication Date - 10 October 2018)

## Convocation

Ref - M.P.U.A. - 2016 - Section 130

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३०(२)] बुधवार, ऑक्टोबर १०, २०१८/आश्विन १८, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३५९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र.क्र.८३/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) तसेच कलम १३० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे दीक्षांत समारंभाच्या संबंधात पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक ४.**

१. **संक्षिप्त नाव.—**या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **व्याख्या.—**या परिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(१) “ दीक्षांत समारंभ ” याचा अर्थ, आपल्या विद्यापीठातील पात्र उमेदवारांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्याविषयक विशेषोपाधी आणि इतर पारितोषके प्रदान करण्याकरिता सर्वसाधारणपणे आयोजित केलेला विद्यापीठाचा समारंभ सोहळा, असा आहे;

(२) “ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ ” याचा अर्थ, संलग्न महाविद्यालयातील अथवा संचालित महाविद्यालयातील अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पात्र विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व पारितोषके प्रदान करण्यासाठी आयोजित केलेला, संलग्न महाविद्यालयाचा अथवा संचालित महाविद्यालयाचा अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा समारंभ सोहळा, असा आहे.

३. **अनुसरावयाची कार्यपद्धती.—**(१) विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या शैक्षणिक नियामिकेमध्ये शैक्षणिक कार्यासाठीच्या वेळापत्रकाव्यतिरिक्त दीक्षांत समारंभाचे तात्पुरते दिनांक समाविष्ट करण्यात येतील.

(२) लगतच्या शैक्षणिक वर्षात दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात येईल.

(३) कुलपतीशी विचारविनिमय करून कुलगुरूकडून निश्चित केलेल्या दिनांकास दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात येईल.

(४) दीक्षांत समारंभापूर्वीच्या बैठकीमध्ये विद्यापरिषद, ज्या व्यक्ती पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींच्या नावांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करील. विद्यापरिषदेच्या शिफारशीवरून, व्यवस्थापन परिषद, अशा पात्र व्यक्तींना अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासाठी मान्यता देईल.

(५) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आणि अधिनियमाच्या तरतुदीनुसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आल्याखेरीज, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यात येणार नाही. अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी आदेशाद्वारे विहित करण्यात येतील.

(६) विद्यापीठ, अशा दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम निश्चित केल्याच्या दिनांकाच्या किमान तीस दिवस अगोदर तो अधिसूचित करील.

(७) दीक्षांत समारंभ आयोजित करण्याकरिता आदेशाव्दारे निर्गमित केलेल्या समारंभकालीन बाबी दीक्षांत समारंभात अंतर्भूत असतील.

(८) विद्यापीठास, संलग्न महाविद्यालय अथवा संचालित महाविद्यालय अथवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्यावतीने अशाप्रकारे नियत केलेल्या दिनांकास पदव्या प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ, पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्याचे काम नेमून देण्याचा अधिकार असेल :

परंतु, असा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ, विद्यापीठाने आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिन्याच्या आत, संलग्न महाविद्यालयाकडून अथवा संचालित महाविद्यालयाकडून अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून, आयोजित करण्यात येईल.

(९) अशा संलग्न महाविद्यालयांनी अथवा संचालित महाविद्यालयांनी अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थांनी, विद्यापीठाच्या निदेशांचे पालन करणे आणि निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करणे आवश्यक असेल.

(१०) विद्यापीठ, दीक्षांत समारंभ आयोजित केल्यानंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत, वरील तरतुदींचे पालन करून, विद्यापीठ अनुदान आयोगाकडे वार्षिक अहवाल सादर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**

शासनाचे सहसचिव.